॥ श्री ॥

1

मी उल्हास द्वा. चेंबूरकर आज एक अतिशय भावपुर्ण निवेदन देत आहे. अर्थातच मी येथे आज जे काही निवेदन करित आहे ते फक्त माझ्याच नव्हे तर माझ्या पूर्ण परिवारासाठी आलेला एक सुखद व आश्चर्यकारक असा अनुभव कथन करीत आहे.

माझा परिवार म्हणजे माझी पत्नी सौ. मृणाल व दोन मुले गौरव व गुरूराज. माझी पत्नी गृहीणी आहे. कु. गौरव हा यंदा इयत्ता दहावीत व कु. गुरूराज हा इयत्ता सातवीमध्ये. स्वामी विवेकानंद हायस्कूलमध्ये इंग्रजी माध्यमामध्ये शिकत आहेत. मी स्वतः एक्सपोर्ट गारमेंट क्षेत्रामध्ये, नीटीडे होजीयरि कापडाचा [Knitted Hosiery Fabric-Kntts Fab] छोटासा व्यवसाय करित आहे. मला जे काही कथन करायचे आहे ते माझा लहान मुलगा कु. गुरूराज ह्याच्यासंबंधी आहे. त्याचा जन्मदिनांक ५ मार्च १९९२ वय वर्ष १४ आहे.

कु. गुरूराज याचा जन्म हा मुदतपूर्व [PREMATURE DELIVERY] आहे. त्याला जन्मतः अशा काही गंभीर शारीरीक समस्या होत्या. ज्यामध्ये त्याचा घशासंबंधी म्हणजे [CLEFT-PALLETE] व उजव्या पायासंबंधी (CTEV] या दोन गंभीर समस्या होत्या. या त्याच्या समस्या मी व माझी पत्नी आम्ही दोघांनी मिळुन शीव रूग्णालय, नायर रूग्णालय, के.इ.एम. रूग्णालय, जॉय रूग्णालय अशा अनेक रूग्णालयामध्ये वारंवार जाऊन दुर करण्यात यश मिळवले.

वयाच्या पाचव्यावर्षी गुरूराजच्या डाव्या डोळ्यामध्ये अचानक मोतीबिंदू उद्‌भवला. त्याची शस्त्रक्रिया नायर रूग्णालय येथे डॉ. श्री. अशोकसरांनी यशस्वी पणे केली. परंतु तेव्हा डॉ. श्री. अशोकसर हयांनी आम्हाला सुचविले की, गुरूराजच्या डाव्या डोळ्यामध्ये पटलाची [RETINA] गंभीर समस्या आहे. म्हणजे ००(RETINA-DETACHMENT]. आहे. व कदाचित ही समस्या जन्मतः असावी असे ते म्हणाले, तद्‌नंतर त्यांनी सुचविल्याप्रमाणे आम्ही के.इ.एम. रूग्णालयात जाऊन डॉ. श्री. जहांगीर सर यांच्याकडुन त्याच्या डाव्या डोळ्याच्या पटलाची (R.D.] शस्त्रक्रिया केली. परंतु दुर्दैवाने ती शस्त्रक्रिया अयशस्वी

झाली व कु. गुरूराजला आता त्याच्या डाव्या डोळ्याची दृष्टी असुन नसल्यासारखी आहे. अर्थातच त्याच्या उजव्या डोळ्याची तोपर्यंत कोणतीही तक्रार नव्हती.

मला तो दिवस अजुनही आठवतो. महिना होता. नोव्हेंबर २००१. कु. गुरूराज त्या वर्षी इयत्ता ४ थी मध्ये शिकत होता. व तो दुसऱ्या दिवशी शाळेच्या दुसऱ्या टर्मसाठी जाण्यास सुरूवात करणार होता. परंतु खेळत असताना अचानक त्याच्या चष्म्याची काच फुटली त्याला दुसऱ्या दिवशी लगेच शाळेत जायचे असल्याने त्याने लगेच मला नवीन चष्मा आणण्यास सांगितले दुसरा दिवस सोमवार असल्याने, आम्ही त्याला घेऊन चुनाभट्टी येथील प्रमुख स्वामी आय हॉस्पीतळ मध्ये त्याच्या डोळ्याचा नंबर तपासून नवीन चष्मा घेण्यासाठी म्हणून गेलो. व तेथे आम्हाला दोन आठवड्याच्या तपासणीनंतर धक्कादायकरित्या सांगण्यात आले कि, गुरूराजच्या उजव्या डोळ्याच्या पटलासंबंधी सुध्दा अतिशय गंभीर समस्या आहे ती म्हणजे ( RETINA DETACHMENT] ज्यामुळे त्याला येत्या काही दिवसात काहीच दिसु शकणार नाही. आमच्या पायाखालुन जमीनच सरकली. कल्पनाही करता येणार नव्हती. कि कु. गुरूराज ला पुढे येणारा काळ कसा असेल ? तेथील डॉक्टर श्री. आशिष वैद्य यांनी आम्हाला तत्काळ शस्त्रक्रिया करण्याची गंभीर सुचना केली. व त्याचबरोबर असे देखील सुचविले की यश हे ईश्वराच्या हातात आहे. काय करावे हे सुचत नव्हते.

परंतु, मी स्वत: तत्पुर्वी, आदित्य ज्योत आय रूग्णालयाचे नाव ऐकले होते. व विशेषत: या रूग्णालयाचे मेडिकल डायरेक्टर डॉ. श्री. एस नटराजन सर ( VITREO MEDICAL SURGEON] यांच्या उज्वल यशाची ख्याती देखील ऐकली होती. व म्हणूनच ईश्वर कृपेने श्री. कुलदेवताच्या कृपेने दिनांक ४ डिसेंबर २००१

या दिवशी दुपारी ११.३० वाजता प्रमुख स्वामी आय हॉस्पीतळ मधुन घरी परत न येता मी व माझी पत्नी आम्ही दोघे कु. गुरूराजला तसेच घेऊन कोणत्याही प्रकारची पुर्वसूचना न देता दादर येथील आदित्य-ज्योत आय हॉस्पीतळ मध्ये गेलो. तेथे कुमारी शेजल हिने आम्हाला त्याही परिस्थितीमध्ये पूर्ण मानासिक आधार दिला व सर्व आवश्यक त्या पुर्वप्राक्रिया (Formalities) पूर्ण करून डॉ. श्री. नटराजन सरांना विनंती केली की गंभीर रूग्ण म्हणून गुरूराजला तत्काळ लवकरात लवकर तपासण्यात यावे. त्याप्रमाणे त्याच दिवशी दुपारी ऑपरेशन थियेटरमध्यून मधल्या वेळात थोडा वेळ बाहेर येऊन सरांनी गुरूराजचा डोळा तपासला व दुसऱ्याच दिवशी त्याच्या Total RETINA DETACHEMENT ची जी अत्यावश्यक शस्त्रक्रिया आहे ती करावी असे आम्हाला तत्काळ सुचविले. कारण या गोष्टीला फार उशीर झाला होता. असे सरांचे मत होते. त्याच दिवशी मी सरांना अतिशय भावनाशीलपणे विचारले कि, "सर माझ्या मुलाला दिसेल ना?" तुम्ही आजपर्यंत अनेकांना दृष्टी दिली आहे, गुरुराजला सुद्धा त्याची दृष्टी द्याल ना? आपण आमच्यासाठी इश्वरी अवतार आहात." तेव्हा सर नम्रपणे म्हणाले कि मी इश्वरी अवतार नाही, मी इश्वर भक्त आहे इश्वराचा शिष्य आहे. व इश्वरावर माझा पूर्ण विश्वास आहे. तेव्हा ही शस्त्रक्रिया मी निश्चितच पुर्णत: यशस्वी करण्याचा प्रयत्न करीन व कु. गुरुराजला निश्चितच दिसेल. त्यावेळेस मी व माझ्या पत्नीच्या डोळ्यांतून सरांच्या या पुढील खात्रीपूर्वक यशाबद्दल व त्यांच्या प्रचंड आत्मविश्वासाबद्दल आनंदाश्रू आले. व सरांच्या पायांना स्पर्श करुन (अर्थातच त्यांनी तसे करु न देता इश्वराला नमस्कार करण्याचे सुचविले, तसे ते नेहमीच सुचवितात व हा त्यांचा सद्गुण व मनाचा मोठेपणा आहे.) गुरुराजच्या दुसऱ्या दिवसाच्या शस्त्रक्रियेसाठी आवश्यक त्या वैद्यकीय तपासणीसाठी बाहेर पडलो.

दुसऱ्या दिवशी म्हणजे दिनांक ५।१२।२००१ ला सायंकाळी डॉ. श्री एस. नटराजन सर यांनी स्वतः कु गुरुराजच्या उजव्या डोळ्याच्या पटलाची (SCLERAL BUCKLING + VITRECTOMY + PERFLUOROCARBONLIQUID + FLUIDGAS-EXCHANGE + ENDOLASER + C3F8) अत्यंत कठिण अशी ही शस्त्रक्रिया ईश्वराच्या कृपेने, श्री कुलदेवतेच्या कृपेने अतिशय कुशलतेने पुर्णतः यशस्वीपणे पार पाडली. मला तो दिवस आजही आठवतो कि डॉ. श्री नटराजन सरांनी ऑपरेशन थियेटर मधुनच ती अतिशय आनंदाची बातमी आम्हाला तत्काळ इंटरकॉम वरुन व्यक्तिशः कळविली. आम्हा दोघांच्या आनंदाला पारावर राहिला नाही. आमच्या आयुष्यातील अत्युच्च अशा अत्यानंदाचा क्षण आम्ही केव्हाही विसरु शकणार नाही. आम्ही सतत ईश्वराच्या व कुलदैवतेच्या अखंड जप करीतच होतो. व ईश्वराने आम्हाला व सरांना उत्तमतः पुर्णतः साथ देऊन यश प्राप्त करुन दिले. तेव्हा आम्हाला अश्रूंना अडविता आले नाही. डॉ. श्री एस नटराजन सर हे स्वतः श्री गणेशभक्त व श्री कृष्णभक्त आहेत त्यांचा भगवान श्री कृष्णाच्या भगवद्गीतेच्या उत्तम अभ्यास आहे व ते भगवद्गीतेचे तत्वज्ञान पुर्णतः मानतात, नव्हे तसे ते आचरणही करतात. त्याच प्रमाणे तेथे येणाऱ्या रुग्णांनाही वेळोवेळी गीतेचे आवश्यक ते तत्वज्ञान सांगून त्यांना धीर देतात.

आजपर्यंत सरांनी स्वतः आवश्यकतेनुसार १८।०२।०२, ३।०२।०४, १८।११।०४ या दिवशी गुरुराजची त्याच उजव्या डोळ्यांची छोटी, मोठी शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पाडली आहे. व कु गुरुराजच्या दृष्टीचे निश्चितपणे पुर्णतः रक्षण केले आहे. अर्थातच प्रत्येक वेळी आमच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करुन आम्हाला हॉस्पिटलच्या फि मध्ये योग्य व शक्य तेवढी सवलत देखील दिली आहे ते येथे सांगणे आवश्यक आहे.

मी स्वतः व माझी पत्नी आम्ही दोघे ४ डिसेंबर २००१ पासून ते आजपर्यंत डॉ. श्री नटराजन सर व डॉ. श्री हितेंद्र मेहता यांच्या सुचनेप्रमाणे जेव्हा जेव्हा आवश्यक

असते तेव्हा तेव्हा कु. गुरुराजला नियमित तपासणीसाठी सरांच्या आदित्य ज्योत आय हॉस्पिटल मध्ये जात असतो. व या पुढे देखील असेच जाऊन त्याच्या दृष्टीची पुर्ण काळजी घेऊ.

आदित्य ज्योत आय हॉस्पीटल मधील डॉ श्री नटराजन सरांचे इतर सहकारी डॉक्टर्स, डॉ श्री हितेंद्र मेहता, डॉ श्री सुनिल मोरेकर, डॉ हिजाब मेहता, डॉ स्मिता बगरींच्या व त्यांचे इतर सहाय्यक डॉक्टर्स यांचे अमोल असे सहाय्य आम्हाला लाभले त्याप्रमाणे हॉस्पीटल मधील इतर स्टाफ, सिस्टर्स विशेषत: शेजल, स्वप्नील राणे, वोतगा, फईम, रेणू व इतर सर्वांनी आम्हाला प्रत्येक वेळी मोलाची साथ दिली. वेळोवेळी मानासिक आधार दिला यात शंका नाही.

नेहमीच गुरुराजच्या डाव्या डोळ्याच्या दृष्टी संबंधी मी सरांशी वारंवार बोलणे करतो, व मला पूर्ण खात्री आहे कि भविष्यामध्ये अगदी लवकरच सर माझ्या मुलाच्या दुस-या डोळ्याला सुद्धा निश्चितपणे उत्तमत: पूर्ण दृष्टी देतील कारण माझा असा विश्वास आहे कि डॉक्टर श्री नटराजन सर हे इश्वराचे दूत आहेत. इश्वराचे पूर्ण आशिर्वाद त्यांना सदोदीत आहेत व यापुढेही असणारच जेणे करुन त्यांच्या हातामध्ये अखंड यश आहे. आजच्या वैज्ञानिक बदलत्या जगामध्ये दररोज नव-नविन शोध लागत आहेत. अर्थातच डॉक्टर श्री नटराजन सर हे यामध्ये अग्रेसर आहेत. मला त्यांच्या व्यावसायिक जीवनाबद्दल इतकी सखोल माहीती नाही. परंतु परदेशामध्ये ज्या काही मेडिकल कॉन्फरन्स होतात. तिथे डॉ नटराजनसर हे स्वत: आपल्या भारत देशाचे प्रतिनिधित्व करतात. व मार्गदर्शनपर लेक्चरर्स-ही देतात. याची मला माहीती आहे.

डॉ श्री नटराजन सरांच्या या यशस्वी कारकिर्दीमध्ये त्यांना आपल्या देशात व परदेशात अनेक मानसन्मान प्राप्त झाले आहेत, आपल्या देशाचे राष्ट्रपती मा. श्री अब्दुल कलामजीं कडून त्यांचा उचीत गौरव झाला आहे. त्याचप्रमाणे

सरांनी आपल्या पुर्वीच्या दादरच्या हॉस्पीटलच्या जागेवर आता डोळ्यांसंबंधी विद्यालय सुरु केले आहे. व आता वडाळा येथे S.I.W.S कॉलेज समोर आदित्य ज्योत आय हॉस्पीटलची एक नविन भव्य इमारत आपणा सर्वांसाठी त्यांच्या अथक परिश्रमांनी व अद्वितीय अशा यशाने इश्वरकृपेने उभी केली आहे.

मला पुर्ण अभिमान व गर्व आहे की डॉ. श्री नटराजन सरांसारखा सुपुत्र, इश्वरपुत्र आपल्या भारत देशात जन्मला आहे अर्थातच हे आपल्या सर्वांचे परम भाग्य आहे. आज केवळ सरांच्या या उज्वल यशामुळेच माझा मुलगा गुरुराज हे सुंदर जग पाहू शकतो व सुंदर जीवन जगू शकतो. या पुढेही इश्वर कृपेने व सरांच्या उज्वल यशस्वी हातांनी दुसऱ्या म्हणजेच डाव्या डोळ्याच्या पुर्णत: यशस्वी शस्त्रक्रीयेने भाविष्यात लवकरच प्राप्त होणाऱ्या दोन्ही डोळ्यांच्या संपूर्ण दृष्टीने आपले पुढील भावी आयुष्य संपुर्णत: यशस्वीपणे व्यतीत करु शकेल असा प्रचंड आत्मविश्वास मला केवळ सरांमुळेच आहे गुरुराज प्रमाणे आजपर्यंत आता पर्यंत अनेकांना सरांनी उत्तम दृष्टी प्राप्त करुन दिली आहे. व या पुढेही इश्वरकृपेने ते हे पवित्र कार्य अनंत काळ यशस्वीपणे पार पाडतील. अशी मला पुर्णत: खात्री आहे.

पुन्हा एकदा इश्वर पुत्र डॉ. श्री एस. नटराजन सर व त्यांचे कुटुंबीय, सरांचे इतर सहकारी डॉक्टर्स. व सरांच्या आदित्य ज्योत आय. हॉस्पीटल मधील इतर सर्व स्टाफ यांना सर्वांना या पुढे देखील इश्वरकृपेने उत्तमोत्तम असे संपुर्ण यश सदोदित मिळावे यासाठी त्या सर्वसाक्षी इश्वराकडे, श्री कुलदेवतेकडे मी स्वत: माझी पत्नि सौ मृणाल माझी मुले कु. गौरव व कु. गुरुराज आम्ही सर्व मनस्वी प्रार्थना करतो व माझे हे भावपुर्ण निवेदन मी आज अंतत: पुर्ण करतो.

नमस्कार

आपला संपुर्णत: ऋणी

श्री उल्हास श्री त्र्येंबुरकर